# "आधुनिक विवाह संस्था" या विषयावर भित्तीपत्रकाच प्रकाशन




आधुनिक विवाह संस्था या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना प्रा.डॉ.बी.एन.रावण समवेत डॉ.वंदना पाटील,डॉ.एस.एस.कुरलीकर, प्रा. दत्तात्रय नाईक व मान्यवर

"आधुनिक विवाह संस्था ही केवळ सामाजिक करार नसून परस्पर समज ,विश्वास,समता आणि जबाबदारी यांवर उभी असलेली मूल्यनिष्ठ नाती जपणारी जीवनसंस्था आहे असे प्रतिपादन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील समाजशास्त्र विभागामार्फत "आधुनिक विवाह संस्था" या विषयावर आयोजित केलेल्या भित्तीपत्रकाच्या प्रकाशन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख डॉ.वंदना पाटील होत्या.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.पी.डी.माने ,डॉ.यु.यु.पाटील,डॉ.भारती शिंदे,प्रा.दत्तात्रय नाईक होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस. एस.कुरलीकर यांनी केले तर आभार श्रीजल लव्हटे हीने मानले तर सूत्रसंचालन स्नेहल गवळी हिने केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.